शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून राज्यात नवीन औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे याकरीता शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१९८/तांशि-४

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३ जुलै, २०१९.

वाचा :- शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१३०/ तांशि-४, दिनांक १० जून,२०१९

प्रस्तावना :

उपरोक्त नमूद दिनांक १०.६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून राज्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, एम.बी.ए.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व) पीजीडीएम (पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे ,सध्याच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे ,औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थेत बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे ,पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे ,विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमामध्ये विलीन करणे इत्यादीबाबत शैक्षणिक वर्ष २०१९- २०२० करीता प्राप्त मान्यतेच्या यादीनुसार शैक्षणिक वर्ष २०१९- २०२०पासून शासन मान्यता देण्यात आली आहे .

शासन निर्णय :

वर नमूद दिनांक १०/६/२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या Annexture “A” मधील अनुक्रमांक १३ येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, उस्मानाबाद या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता १०० प्रवेशक्षमतेसह नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे -:

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये या संस्थेमधील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता नसल्याने या संस्थेने फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडून ६ महिन्याच्या आत मान्यता घ्यावी.

११) तसेच फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास या प्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहिल, अशा आशयाचे हमीपत्ररुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थेने तंत्र शिक्षण संचालनालयास द्यावे.

१२) या संस्थेस विहित मुदतीत फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता न मिळाल्यास राज्य शासनाची मान्यता आपोआप रद्द होईल व सदर संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रवेश देण्यात येणार नाहीत. याबाबतची जबाबदारी तंत्र शिक्षण संचालनालयाची राहिल.

१३) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०३११५२२०४२०८ असा आहे. हा आदेशडिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.07.06 17:35:07 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, ३०५, शासकीय तंत्रकिनेतन इमारत,४९, खेरवाडी,अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१३.
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
६. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
१०. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
११. नस्ती क्रमांक टीईएम-२०१९/प्र.क्र.१३०/तांशि-४
१२. निवड नस्ती/तांशि-४